# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.२५/०४/२०२४

**प्रेसनोट**

"जागतिक हिवताप दिन" हा दिनांक २५ एप्रिलला दरवर्षी साजरा करण्यात येतो. हिवताप विषयी जनतेमध्ये जनजागृती करणे, प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणी साठी सक्रीय सहभाग प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रमाद्वारे नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न करणे हा मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी दि.२५/०४/२०२४ रोजी जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. या वर्षाचे घोषवाक्य "Accelerating the Fight Against Malarial for a more Equitable world" म्हणजेच " मलेरिया विरुद्ध जगाच्या संरक्षणासाठी गतिमान करू, या लढा मलेरियाला हरविण्यासाठी" त्याचप्रमाणे "गप्पी मासे पाळा व हिवताप टाळा"

यावेळी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

- मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा.साथरोग अधिकारी यांची पावसाळा पूर्व हिवताप /डेंग्यू बाबत माहिती मार्गदर्शन सभा घेऊन पुढील नियोजन करण्यास मार्गदर्शन केले.
- महानगपालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी आपल्या स्तरावर आरोग्य निरीक्षक, राज्य आरोग्य कर्मचारी, ए.एन.एम., आशा व औषध फवारणी कर्मचारीद्वारे प्रभात फेरी काढण्यात आली.
- ए.एन.एम. व आशा यांच्या मार्फत माईक अनाऊंसमेंट द्वारे प्रचार करण्यात आला. तसेच विविध ठिकाणी हिवतापाबाबत गटसभा आयोजित करून हिवताप आरोग्य विषयी माहिती देण्यात आली.
- महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध कार्यक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये हिवतापाचे बॅनर लावून जनजागृती करण्यात आली. तसेच कार्यक्षेत्रामध्ये जनजागृती पत्रकाचे वाटप करण्यात आले.
- नागरी आरोग्य केंद्राच्या स्तरावर आरोग्य प्रदर्शन भरवण्यात आले. त्यात हिवतापाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना या संबंधी आरोग्य शिक्षण देण्यात आले.
- हिवतापाबाबत जनजागृती पथनाट्य सादर करण्यात आले.
- कार्यक्षेत्रात हिवताप /डेंग्यू या आजाराबाबत जनजागृती करून लोकांना प्रतिबंधक व उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
- पावसाळापूर्व प्रतिबंधात्मक कार्यवाही बाबत नियोजन करण्यात आले.

असे विविध उपक्रम महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**